पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ६६

सभावृत्तांत

दिनांक - २५/०६/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २५/०६/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.जगदीश शेट्टी
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.महेशदादा किसन लांडगे
८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
९) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.मुंढे, मा.दुरगुडे,मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.डॉ.मनोज देशमुख – प्र. वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी,मा.काची, मा.निकम, मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.साळवी,मा.कुलकर्णी,मा.सय्यद,मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र. शिक्षण अधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>**

विषय क्रमांक - १७ ) ***INJ ASV 10 ml*** खरेदी बाबत...

विषय क्रमांक - १८ ) श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळयातील वारक-यांना मोफत औषधोपचार करणेबाबत..

विषय क्रमांक - १९) क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षण खर्चास मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक - २०) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील अ प्रभाग व अ मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.चंद्रकांत वाळके, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - २१) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५४९ दि.१८/६/२०१३ मध्ये दुरुस्ती करणेबाबत.. मा.चंद्रकांत वाळके,मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली

सुचक - मा.चंद्रकांत वाळके    अनुमोदक – मा.आशा शेंडगे

थेरगाव येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व स्थायी समिती सदस्या मायाताई बारणे यांचे सासरे नागुभाऊ बारणे, शेकापचे कामगार नेते दि.बा.पाटील तसेच स्थायी समिती सदस्या सुरेखाताई भोंडवे यांच्या सासु सरीता गलांडे यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहुन मा.स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २६/६/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- सभा बुधवार दिनांक २६/६/२०१३ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ६६
सभावृत्तांत
(दि.२५/०६/२०१३ ची तहकुब सभा)

दिनांक - २६/०६/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२५/०६/२०१३ ची तहकुब सभा बुधवार, दिनांक २६/०६/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.जगदीश शेट्टी
८) मा.भालेकर अरुणा दिलीप
९) मा.वाघेरे सुनिता राजेश
१०) मा.महेशदादा किसन लांडगे
११) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१२) मा.लोंढे गणेश नारायण
१३) मा.कदम सदगुरु महादेव
१४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१५) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी – आयुक्त, मा.मुंढे, मा.दुरगुडे - सहा. आयुक्त,मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता,मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.डॉ.मनोज देशमुख – प्र. वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी,मा.काची, मा.दुधेकर, मा.ढगे,मा.निकम, मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे,मा.पिरजादे,मा.सय्यद,मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र. शिक्षण अधिकारी (माध्यमिक),मा.पोमण – संगणक अधिकारी,मा. शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

अ) दिनांक ११/०६/२०१३ व १३/०६/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ६४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १८/६/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक - ६५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ३५८८ विषय क्रमांक – १
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/५५६/२०१३दि.१०/६/२०१३.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१० अन्वये, जलक्षेत्र क्र.बी/९,१०,११ मध्ये अजमेरा टाकी व इतर टाकीचे परिसरात वॉचमन क्वॉटर बांधणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे, सिमाभितींवर चेनलिंक फेंसिंग करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू. १६,७७,८७१/- [र.रू.सोळा लाख सत्याहत्तर हजार आठशे एक्काहत्तर] पेक्षा २७.४६ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५८९ विषय क्रमांक – २
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/५५५/२०१३ दि.१०/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१२-१३ मधील अ.क्र.२९ अन्वये, क प्रभागातील भोसरी भागातील जलवाहिन्या वरील नादुरुस्त झालेले व्हॉल्व बदलणे व वितरण व्यवस्थेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.दीप कन्स्ट्रक्शन (नि.र.रू. २७,९८,८६३/- [र.रू.सत्तावीस लाख अठ्ठ्यान्नव हजार आठशे त्रेसष्ट] पेक्षा ३०.५० **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९० विषय क्रमांक – ३
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/४८७/२०१३दि.१२/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालयातील एकूण ९,६९१ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ प्रमाणे शालेय गणवेश शिक्षण मंडळाकडील निविदा मंजूर दराने निविदाधारक मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म, वाकड, पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजित र.रू. १,७१,९६,२२३/-(अक्षरी र.रु.एक कोटी एक्काहत्तर लाख शहाण्णव हजार दोनशे तेवीस फक्त) च्या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच संबंधीतांबरोबर करारनामा करणेस व पुरवठा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९१ विषय क्रमांक – ४
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/५/कावि/३४५/२०१३दि.१३/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती दि.१३ मे, २०१३ रोजी असल्याने सदर जयंतीचे औचित्य साधून दि.१०/५/२०१३ ते १२/५/२०१३ या कालावधीत व्याख्याने, विविध कार्यक्रमांचे आयोजन कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी याठिकाणी करण्यात आलेले असून याकामी थेट पध्दतीने अंदाजे र.रू.१,२२,१००/- (र.रू. एक लाख बावीस हजार शंभर फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९२ विषय क्रमांक – ५
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – पर्यावरण अभियांत्रीकी
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/६/५६५/२०१३दि.१३/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या कासारवाडी येथील टप्पा १ या मैलाशुध्दीकरण प्रकल्पास १५ वर्षाहून जास्त काळ झाल्याने व या केंद्रातील बहुतेक मशिनरी वारंवार दुरुस्ती करून वापरल्याने सद्यःस्थितीत निरूपयोगी झालेली आहेत. सदरच्या केंद्राचे चालन, देखभाल व दुरुस्तीचे काम त्याचप्रमाणे केंद्रातील प्रमुख मशिनरीची मोठी दुरुस्ती व मोठे बदल दरसुचीमधील दरानुसार करणेस यापुर्वीच ठराव क्र.१४६६२, दि.९/८/२०११ अन्वये मे.एच.एन.भट इंजि.प्रा.लि. यांचेकडून करून घेणेस मान्यता मिळालेली असून सदरच्या कामाच्या ढोबळ खर्चास मान्यता घेण्यात आली होती. सदर प्लॅन्टची दुरुस्तीकामी येणा-या अंदाजित र.रू.११.७६ कोटीचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.
सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९३ विषय क्रमांक – ६
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१/कावि/४६६/२०१३दि.४/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा वैद्यकीय विभागांतर्गत बोपखेल येथे दि.१/६/२०१३ पासून नव्याने दवाखाना सुरू करणेबाबत मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सुचित केले आहे. बोपखेल दवाखान्यासाठी सांस्कृतिक केंद्र बोपखेल येथील पहिल्या मजल्यावरील जागा ताब्यात मिळालेली आहे. तसेच येथिल स्थापत्य विषयक कामे स्थापत्य विभागाकडून पुर्ण करणेत आलेली आहेत व दि.१/६/२०१३ पासून दवाखाना सुरू करणे शक्य असल्याने सांस्कृतिक केंद्र बोपखेल येथे नव्याने दवाखाना सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९४ | विषय क्रमांक – ७
दिनांक – २६/६/२०१३ | विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.छाया साबळे | अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/३१२/२०१३दि.१४/६/२०१३.

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१६/१२-१३ मधील अ.क्र.७ अन्वये, भोसरी प्रेक्षागृहातील विद्युत विषयक किरकोळ कामे करणे तसेच अग्निशामक व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस (नि.र.रू.९,४८,३९६/- र.रू.नऊ लाख आठ्ठेचाळीस हजार तीनशे शहाण्णव पेक्षा ११.११ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९५ | विषय क्रमांक – ८
दिनांक – २६/६/२०१३ | विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.विनया तापकीर | अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६०१/२०१३दि.१४/६/२०१३.

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९६ | विषय क्रमांक – ९
दिनांक – २६/६/२०१३ | विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.चंद्रकांत वाळके | अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३५२/२०१३दि.१७/६/२०१३.

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/१२-१३ मधील अ.क्र.८ अन्वये, मनपाच्या अ व क प्रभागातील येणा-या पंप हाऊसमध्ये क्रेन (ई.ओ.टी.) बसविणेकामी मे.फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन (नि.र.रू.१६,२५,५०७/- *[*र.रू.सोळा लाख पंचवीस हजार पाचशे सात*]* पेक्षा ९.६० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९७ | विषय क्रमांक – १०
दिनांक – २६/६/२०१३ | विभाग – उद्यान
सुचक – मा.शकुंतला धराडे | अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/२२०/२०१३दि.१४/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ अन्वये, मनपाचे वृक्षरोपणासाठी मोठी रोपे खरेदीकामी मे.निर्सग लॅन्डस्कॅप सर्व्हिसेस (नि.र.रू.४८,००,०००/- *[*र.रू.आठ्ठेचाळीस

लाख] अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९८ विषय क्रमांक – ११
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा. आश शेंडगे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/५६५/२०१३दि.१८/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.स्वप्ना भंडारी, रेडिओलॉजिस्ट कामावर रूजू होईपर्यंत अन्य रेडिओलॉजीस्टची तालेरा रूग्णालयात नेमणूक करणे शक्य नसलेने रूग्णालयीन कामकाजाचे दृष्टीने सदरचे पदाचा समावेश ***Walk In Interview*** मध्ये करून ***Walk In Interview*** मधुन सदरचे पद ६ महिने या कालावधीसाठी भरणेस व तसेच मानधनावरील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना देणेत येत असलेल्या मानधनाचे ठरलेल्या धोरणानुसार त्यांना मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३५९९ विषय क्रमांक – १२
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/५६४/२०१३दि.१८/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभारी वैद्यकीय अधिकारी तालेरा रूग्णालय यांनी त्यांचेकडील पत्रान्वये तालेरा रूग्णालयातील फिजिशियन डॉ.जयंत हांडे हे दि.३१/५/२०१३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेचे कळवून तालेरा रूग्णालयासाठी एका फिजिशियनची त्वरीत नियुक्ती व्हावी असे कळविले आहे, नियमित वेतनश्रेणीत फिजिशियनची नियुक्ती होईपर्यंत रूग्णालयीन कामकाजाचे दृष्टीने सदरचे पदाचा समावेश ***Walk In Interview*** मध्ये करून ***Walk In Interview*** मधुन सदरचे पद भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०० विषय क्रमांक – १३
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१ब/कावि/१४५/२०१३दि.१९/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२४/२०१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, औंध रावेत रस्ता ***Dedicated BRTS Lane*** करणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.६,२७,१८,७६५/- [र.रू.सहा कोटी सत्तावीस लाख अठरा हजार सातशे पासष्ट] पेक्षा ११.०७ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५,८५,६४,५८८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा

करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०१ विषय क्रमांक – १४

दिनांक – २६/६/२०१३ विभाग – नगरसचिव

सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/८६९/२०१३दि.१९/६/२०१३.

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०२ विषय क्रमांक – १५

दिनांक – २६/६/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा. सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/३७४/२०१३दि.१९/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या तालेरा रूग्णालयामध्ये साफसफाई कामकाजाकरिता व इतर संलग्न कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना रूग्णालय उद्योगातील महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या किमान वेतन दराने वेतन देऊन सदर कामगारांना दर सहा महिन्यांनी शासनामार्फत जाहिर करण्यात येणारा वाढीव विशेष भत्ता व दर आठवडयास साप्ताहिक सुट्टी देणे कायद्याने आवश्यक असल्याने सध्याचे किमान वेतन कायद्यानुसार मा. न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत किंवा मनपाचा पुढील निर्णय होईपर्यंत प्रतिमहा र.रू. ७,६९४/- प्रमाणे (प्रति दिनी र.रू. २९६/- प्रमाणे ) मानधन अदा करणेस व सदरचे मानधन धनादेशाद्वारे कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यावर जमा करण्यास तसेच मानधन अदा करणेकामी विलंब होवु नये म्हणुन तालेरा रूग्णालयामार्फत बिल काढणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०३ विषय क्रमांक – १६

दिनांक – २६/६/२०१३ विभाग – संगणक

सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/४/कावि/२१७/२०१३दि.२०/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे. डिझायर ग्राफीक्स लि. यांचे मार्फत स्थानिक संस्था कर (LBT) Application करिता एकूण ४ लाख SMS Route (pack) उपलब्ध करणेसाठी र.रु. १,३९,३२६/- (अक्षरी र.रु.एक लाख एकोणचाळीस हजार तीनशे सव्वीस फक्त )चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक – ३६०४ विषय क्रमांक – १७
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा. अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.औ.भां./१/कावि/१२३/२०१३दि.२५/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिकेस आवश्यक असणारे ***INJ.ASV 10ml = 500 Vials*** इंजेक्शनची गरज लक्षात घेता मे.हाफकीन बायो फार्मास्युटिकल्स कार्पोरेशन लि.मुंबई या संस्थेकडुन र.रु. ६८७.७८ प्रति व्हायल या सुधारित दराने खरेदी करणेस व त्याची एकुण किंमत र.रु.३४३८९०/- (६८७.७८ *x* ५०० व्हायल्स ) आगाऊ र.रु. ३,४३,८९०/- अदा करणेस तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. २९९४ दि.५/३/२०१३ मध्ये ***Inj.ASV 10ml.*** या इंजेक्शनची मंजुर झालेली संख्या ५०० नग मे.हाफकीन बायो फार्मास्युटिकल्स कार्पोरेशन लि. मुंबई यांनी दिलेल्या नवीन दर प्रती व्हायल र.रु. ६८७.७८ या दराने सन २०१३-१४ मध्ये आवश्यकतेनुसार खरेदी करणेस तसेच इमीनो गोबीन हे मणक्याच्या इन्फेक्शनवर उपयोगी पडणारे औषध आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०५ विषय क्रमांक – १८
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – वैद्यकीय मुख्य
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.औ.भां./१/कावि/१२१/२०१३दि.२१/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतुन श्री.क्षेत्र तुकाराम महाराज व श्री.संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या श्री.क्षेत्र पंढरपुर येथे वारक-यांसह पायी जातात. या वारकरी लोकांसाठी महानगरपालिकेमार्फत मोफत औषधोपचार करणेत येतात. त्यानुसार यावर्षी दि.३०/०६/२०१३ व दि. ०१/०७/२०१३ या दिवशी दोन्ही पालख्यांचे प्रस्थान होणार आहे.

पिंपरी चिंचवड मनपा तर्फे वारक-यांना मोफत औषधोपचार देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०६ विषय क्रमांक – १९
दिनांक – २६/६/२०१३ विभाग – कामगार कल्याण
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काक/५/कावि/९६/२०१३दि.१८/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिकेच्या वतीने सन्मा.सदस्य अधिकारी, कर्मचारी यांचेसाठी ०१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ अखेर आयोजित करण्यात येणा-या प्रशिक्षणासाठी इतर प्रशिक्षण संस्था मार्फत आयोजित केलेल्या निवासी प्रशिक्षणासाठी, प्रशिक्षण अभ्यास दौरे यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेस व सदरचा खर्च कामगार कल्याण व प्रशासन विभागाकडील अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण या लेखाशिर्षावरुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३६०७ विषय क्रमांक – २०

दिनांक – २६/६/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा. संगिता भोंडवे

संदर्भ:- मा. चंद्रकांत वाळके,मा. संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

अ प्रभाग व अ मुख्यालयामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे, तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुदींमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ /घट र.रु. २१,२५,०००/- )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३६०८ विषय क्रमांक – २१

दिनांक – २६/६/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.आशा शेडगे

संदर्भ:- मा. चंद्रकांत वाळके,मा. संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.३५४९ दि. १८/६/२०१३ मधील (नि.र.रु. २०,०४,४९१/- (र.रु. वीस लाख चार हजार चारशे एक्क्याण्णव ) हा मजकुर वगळणेत यावा व त्याऐवजी (नि.र.रु. २४,०४,४९१/- (र.रु. चोवीस लाख चार हजार चारशे एक्क्याण्णव ) हा मजकुर समाविष्ट करण्यात येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/**589** /२०१३
दिनांक - **26**/०६/२०१३.



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.